महाराष्ट्र विकास सेवा, गट-अ मधील परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांचा परिवीक्षाधीन कालावधी समाप्त करणे तसेच त्यांना अनुज्ञेय असलेल्या वार्षिक वेतनवाढी मंजूर करणेबाबत.

राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-२००४

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन आदेश क्रमांकः मविसे १०/२०११/ प्र.क्र.१२५/ आस्था-३अ
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दिनांकः- २८ जानेवारी, २०१६

वाचा :-

१) **शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.मविसे१०/२००९/प्र.क्र.२५२/ आस्था-३, दि.१०.६.२००९**
२) **शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.मविसे१०/२००९/प्र.क्र.२५२/ आस्था-३, दि.१०.६.२००९**
३) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रः-एसआरव्ही/प्र.क्र.५/९४/आठ, दि.३.२.१९९४**
४) **शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.मविसे-१०/२०११/ प्र.क्र.१२५/ आस्था-३अ, दि.२०.५.२०१३**
५) **शासन आदेश,ग्रामविकास व जलसंधारण विभाग,क्र. मविसे-१०/२०११/प्र.क्र.१२५/ आस्था-३अ, दि.२८.१.२०१६**

आदेश :-

संदर्भाधीन शासन निर्णय क्र.१ व २ अन्वये ज्या अधिकाऱ्यांची महाराष्ट्र विकास सेवा, गट-अ संवर्गात परिवीक्षाधीन अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती, त्यापैकी श्री.शिरिष द.बनसोडे यांनी परिवीक्षाधीन कालावधी समाप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी (जसे कामकाज समाधानकारक असणे, मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे, वर्तणूक शोभनीय असणे, तसेच परिवीक्षाधीन काळात त्यांनी उपभोगलेल्या रजा विचारात घेणे) समाधानकारकपणे पूर्ण केल्या आहेत. त्यामुळे खालील तक्त्यातील रकाना क्रमांक ५ (पाच) मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून (संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याच्या दिनांकापासुन व परिविक्षाधीन कालावधीत घेतलेल्या रजेनुसार त्यांचा परिविक्षाधीन कालावधी पुढे ढकलून) परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यास शासन मंजूरी देत आहे. त्याप्रमाणे श्री.बनसोडे यांना अनुज्ञेय असलेल्या वार्षिक वेतनवाढी देऊन त्यांची पुढील दिनांकापासून वेतननिश्चिती तात्काळ करण्यात यावी :-

अ.क्र.	परिवीक्षाधीन अधिकाऱ्याचे नांव	रुजू झाल्याचा दिनांक	परिवीक्षाधीन कालावधीत घेतलेल्या रजा	परिवीक्षाधीन कालावधी समाप्त केल्याचा सुधारीत दिनांक
१.	श्री.शिरिष द.बनसोडे	दि.१६.६.२००९	४८ दिवस	दि.१७.३.२०१३

२. श्री.शिरिष द.बनसोडे यांनी संगणक परीक्षा दोन वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक होते. तथापि, त्यांनी दि.२८.१.२०१३ रोजी संगणक परीक्षा उत्तीर्ण केली असल्याने शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, दि.२५.१.१९९९ च्या नियम ६ नुसार शासनास सदर प्रमाणपत्र सादर करायच्या मुदतीची अट, कारण अभिलीखित करुन संदर्भ क्र.५ अन्वये शिथिल करण्यात आली असल्याने सदर संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याच्या दिनांकापासून परिवीक्षाधीन कालावधीत घेतलेल्या रजेनुसार त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी पुढे ढकलण्यात आला असून तो दिनांक १७.३.२०१३ पासून समाप्त करण्यांत येत आहे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२८१५१३०८७९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHINDE VIJAY DATTATRAYA

Digitally signed by SHINDE VIJAY DATTATRAYA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD,CID - 917064, postalCode=400032, st=Maharashtra, cn=SHINDE VIJAY DATTATRAYA
Date: 2016.01.28 17:14:42 +05'30'

(वि.द.शिंदे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. विभागीय आयुक्त,औरंगाबाद
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद
३. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, मुंबई/ नागपूर
४. संबंधित अधिकारी द्वारा संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद
५. अवर सचिव (आस्था-२), ग्राम विकास व जलसंधारण विभाग
६. कार्या. (आस्था-३), ग्राम विकास व जलसंधारण विभाग
७. निवड नस्ती, आस्था-३ अ, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.